या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

पाटोदा
PATODA SANCHAR
# संचार
E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक १५७ वा ❑ बुधवार दि. ३० जुलै २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -157 ❑ Wednesday 30 July 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359




# 'वादग्रस्त विधानं, कृती खपवून घेणार नाही'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी २० मिनिटं घेतला मंत्र्यांचा क्लास



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २० मिनिटे मंत्र्यांचा क्लास घेतला. इथून पुढे वादग्रस्त विधाने, कृती अजिबात खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी मंत्र्यांना दिला आहे. असेच प्रकार होत राहिले तर सरकारची प्रचंड बदनामी होते. ही अखेरची संधी असून काय कारवाई करायची ती करूच. पण आता एकही प्रकार खपवून घेणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांना तंबी दिली आहे.

वास्तविक, आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. एकूण ८ मोठे निर्णय या बैठकीत झाले. तर दुसरीकडे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेतला जाईल, अशी चर्चादेखील राजकीय वर्तुळात होती. मात्र, तूर्तास तरी वादग्रस्त ठरलेले मंत्री कोकाटे यांचा राजीनामा घेतला जाणार नसल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, त्यांना या बैठकीत समज दिल्याचंही बोललं जात आहे. राज्य मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर सगळे अधिकारी बैठकीतून बाहेर पडले. मात्र, मंत्र्यांची बैठक सुरू राहिली. मिळालेल्या माहितीनुसार, तब्बल २० मिनिटे चाललेल्या या अंतर्गत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वादग्रस्त विधानं आणि गैरप्रकारांवरून तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, या पुढे थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारादेखील दिला.

**'मंत्र्यांनी जबाबदारीनं वागावं'**

मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी २० मिनिटं सगळ्या मंत्र्यांचा क्लास घेतला. वादग्रस्त विधानं, वादग्रस्त कृती अजिबात खपवून घेतली जाणार नाही. यामुळे सरकारची प्रचंड बदनामी होते. ही शेवटची संधी आहे. यापुढे थेट कारवाई करण्यात येईल. अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांचे कान टोचल्याचं समोर आलं आहे.

पान दोन वर

# १५९ कोटींच्या नगररोडचे निकृष्ट काम; अवघ्या ४ महिन्यांत पडले खड्डे!

## गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; डागडुजी करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न; चौकशी करून कारवाईची मागणी-डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांना जोडणाऱ्या नगररोडच्या २४.५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम जून २०२४ मध्ये सुरू झाले. तब्बल १५९ कोटी रुपये खर्च करून हे काम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच, अजून पूर्णही न झालेले रस्ते फक्त चार महिन्यांतच खचू लागले असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत.

विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच रस्त्यावर खड्डे पडल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे. प्रशासनाने तातडीने डागडुजी करून विषय थोपवण्याचा प्रयत्न केला असला, तरी कामाच्या निकृष्ट दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी बीड आणि महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, दोषींवर कठोर कारवाईसह सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.



पहिल्या छायाचित्रात अवघ्या ४ महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नविन रस्त्यावर पडलेले खड्डे तर दुसऱ्या छायाचित्रात पडलेले खड्डे बुजविण्यात येऊन प्रकरण दाबण्याचा केविलवाणा प्रयत्न

**कामात विलंब, दंड ठोठावूनही नाही सुधारणा**

हे रस्ते काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अंतर्गत साकेत कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिले असून, डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र वेळेत काम पूर्ण न झाल्याने आता नोव्हेंबर २०२५ ही नवीन डेडलाईन दिली आहे.

कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला होता. तरीदेखील कामाच्या गतीत किंवा गुणवत्तेत कोणतीही सुधारणा झालेली दिसून येत नाही.

### गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; चौकशी करा; अन्यथा आंदोलन!


शहरातील सर्वांत महत्त्वाचा, शासकीय कार्यालये आणि नागरी वर्दळीचा रस्ता चार महिन्यांतच खचू लागल्याने संपूर्ण यंत्रणेला धक्का बसला आहे. प्रशासनाकडून केलेली डागडुजी म्हणजे निकृष्ट काम झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे, असा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी दोषींवर कठोर कारवाई आणि सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# ज्यांनी चुकीच्या पद्धतीनं लाभ घेतलाय, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल

## महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरेंचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीनं राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली होती. या योजनेला महाराष्ट्रात अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला, तर महायुतीसाठी ही ऐतिहासिक आणि क्रांतिकारक योजना ठरली आहे. या योजनेमुळं महायुती सरकार पुन्हा सत्तेत आली, असं म्हटलं तरी ते वावगं ठरणार नाही. ही योजना आल्यानंतर आता एक वर्ष पूर्ण होत असताना या योजनेत चुकीच्या पद्धतीनं लाभ घेतल्याच्या घटना समोर येत आहेत. परंतु ज्यांनी चुकीच्या पद्धतीनं लाभ घेतला आहे. त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात येईल, असा इशारा महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिला आहे. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्या बोलत होत्या.



**रक्कम रिकव्हरी करण्याबाबत शासन कटिबद्ध**

याआधी सुद्धा ३०-३५ अकाउंट एका व्यक्तीच्या नावे असल्याची घटना समोर आली होती. त्यावेळेला आम्ही ते अकाउंट सिज केले होते. या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यामध्ये सुद्धा आम्हाला चुकीच्या पद्धतीनं लाभ घेतल्याचा घटना समोर आल्या आहेत. साधारणपणे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हा २६ लाखांचा डेटा विभागाकडून क्रॉस व्हेरिफाय करणं आहे. हा डेटा दिल्यानंतर याची ग्राउंड लेव्हलची स्क्रूटिनी करून नक्की त्याच्यामध्ये पात्र किती? अपात्र किती? याची पडताळणी सुरु आहे. लाडकी बहीण योजनेची नोंदणी झाली. तेव्हा २.६३ करोडपेक्षा जास्त नोंदणी झालेली होती. त्यातून साधारणपणे २ कोटी ४७ लक्ष महिलांना लाभ दिला आहे. म्हणजे आम्ही १५-२० लाखाचा रजिस्ट्रेशनचा डेटा ऑलरेडी स्क्रूटिनी केलेला होता. या योजनेत रेगुलराइजेशन पाहिजे. चुकीचे प्रकार थांबवण्यासाठी विभाग किंवा शासन योग्य ती पाऊल उचलत असेल, तर त्याबाबत कोणाची हरकत नसली पाहिजे. लाभ हा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. आता चुकीच्या लाभार्थ्यांनी शासनाची दिशाभूल केलेली असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई किंवा त्यांच्याकडून ती रक्कम रिकव्हरी करण्याबाबत

पान दोन वर

# एसईबीसी विद्यार्थ्यांना नॉन-क्रीमिलेअर बंधनकारक

**मुंबई । प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाच्या दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून त्यावजी नॉन-क्रीमिलेअर प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून हा बदल लागू असणार असल्याचे सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यताप्राप्त खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठांत विनाअनुदानित तत्त्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या एसईबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्याचा निर्णय २९ जानेवारी २०२५ ला घेण्यात आला होता. त्याऐवजी नॉन-क्रीमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून हा निर्णय लागू करण्यात आला आहे. मात्र, हा आदेश लागू होण्याच्या पूर्वीच्या कालावधीसाठी परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय होणार नसल्याचे शासनाने या परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# रोहित पवारांची परळीत महादेव मुंडे कुटुंबियांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

मला राजकीय काहीच बोलायचे नाही. एस आय टी स्थापन करून काहीच होत नाही. तुमच्या सोबत सर्व जाती धर्मातील लोक आहेत असे म्हणत रोहित पवारांनी मुंडे कुटुंबियांना आश्वस्त केले.

यावेळी रोहित पवार यांनी बीड येथील पोलिस अधीक्षक यांना कॉल केला आणि ज्या प्रमाणे मागणी केली आहे त्या प्रमाणे अधिकारी नेमून खुनाचा तपास करण्यात यावा असे निवेदन यावेळी रोहित पवार यांनी कॉलवर केले. या प्रकरणात सबंध महाराष्ट्राने पाहिले आहे कश्या पद्धतीने त्यांचा खून केला गेला आहे. तुम्ही अद्याप परळी येथील लोकांना आणखी ओळखलं नाही. आता मी आमच्या बहिणीला आणि या तीन मुलांच्या आईला आम्ही काय सांगायचे असा सवाल या वेळी रोहित पवार यांनी एस पी ना केला.साबळे यांची नियुक्ती करण्यासाठी आय जी यांना बोलावे लागणार.असे एस पी यांनी रोहित पवार यांना म्हटले आहे. यावेळी रोहित पवार यांनी आय जी यांना कॉल केला.



प्रकरणाला २१ महिने उलटले बीड जिल्ह्याच्या परळी येथील मयत व्यापारी महादेव मुंडे यांच्या कुटुंबाची भेट घेण्यासाठी आमदार रौहित पवार दाखल झाले.

यावेळी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर देखील रोहित पवार यांच्या सोबत मुंडेंच्या भेटीस परळीत

पान दोन वर

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून, मराठवाड्यात ३ हजार रुग्णांना २५ कोटींची मदत; आरोग्य शिबिरातून १२ हजार नागरिकांना दिलासा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा मोठा आधार बनला आहे. विशेषतः मराठवाडा विभागात जानेवारी ते जून २०२५ या अवघ्या सहा महिन्यांत तब्बल ३ हजार ३९ रुग्णांना २५ कोटी ५८ लाख ३१ हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.

| जिल्हा | लाभार्थी नागरिक | रक्तदाते: |
|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ३,०५८ | १६१ |
| बीड | १,१०० | ७५ |
| परभणी | ७६३ | ४६७ |
| लातूर | २,५२२ | ८५२ |
| जालना | ३७३ | ६४ |
| नांदेड | २२६ | ६३९ |
| धाराशिव | ७४२ | ३८ |
| हिंगोली | ३,६२५ | ५७ |




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आला. त्यातून लाभार्थी नागरिकांची संख्या वाढली. त्यासोबतच आरोग्य शिबिर व रक्तसंकलन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविणे सहज शक्य होत आहे, असं मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितलं.

**आरोग्य शिबिरे आणि रक्तदान:**

१ मे ते २५ जुलै दरम्यान जिल्हा कक्षाच्या मदतीने घेण्यात आलेल्या आरोग्य व रक्तदान शिबिरांमध्ये १२,४०९ नागरिकांची आरोग्य तपासणी तर २,३५३ नागरिकांनी रक्तदान केले.

**२० गंभीर आजारांकरिता मदत**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या

पान दोन वर

### जिल्हानिहाय मदत:

छत्रपती संभाजीनगर -६३३ रुग्णांना ५ कोटी ३३ लाख ३८ हजार
बीड -६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार,
परभणी - ५३३ रूग्णांना ४ कोटी ६७ लाख ८२ हजार
लातूर- ३८५ रूग्णांना ३ कोटी २९ लाख ५५ हजार
जालना-३६७ रूग्णांना ३ कोटी ११ लाख ४५ हजार
नांदेड- ३२३ रूग्णांना २ कोटी ८० लाख २० हजार
धाराशिव-२५७ रूग्णांना २ कोटी २१ लाख
हिंगोली- १३२ रूग्णांना १ कोटी १६ लाख रूपये
प्रमाणे वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.

संचार

# वादग्रस्त मंत्री अन फडणवीसांचा संताप!

मंत्र्यांची वादग्रस्त विधाने आणि कृती अजिबात खपवून घेतली जाणार नाही. वादग्रस्त विधानांमुळे सरकारची बदनामी होते. आपले सरकार चांगले काम करत असून विरोधकांच्या हातात आयते कोलीत देऊ नका. तुम्हाला ही अखेरची संधी आहे. अन्यथा जी कारवाई करायची ती करूच, असा निर्वाणीचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांना दिला. मुख्यमंत्र्यांनी वादग्रस्त मंत्र्यांना शेवटची संधी देऊन त्यांना तूर्त अभय दिले आहे. वादग्रस्त ठरलेल्या मंत्र्यांवर कारवाई टाळताना फडणवीस यांनी मंत्र्यांची लाज काढली. शपथा देऊनही तुम्हाला लाज वाटत नाही, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांना फैलावर घेतले.

पावसाळी अधिवेशनात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तसेच गृह राज्यमंत्री योगेश कदम वादग्रस्त ठरले. चित्रफितींमुळे बदनाम झालेल्या शिरसाट आणि कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्षाने लावून धरली होती. त्याचे पडसाद आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत उमटले. राज्य मंत्रिमंडळाच्या अजेंड्यावरील विषय संपल्यानंतर मुख्य सचिवांसह सर्व अधिकाऱ्यांना बैठकीतून बाहेर काढण्यात आले. अधिकारी बाहेर गेल्यानंतर थेट विषयाला हात घालण्यात आला.

सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्र्यांच्या वागणुकीबद्दल नाराजी व्यक्त केली. मंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलताना आपली वर्तणूक चांगली ठेवावी. राज्य सरकार चांगले काम करत असून मंत्र्यांच्या विधानाने त्यावर पाणी फेरता कामा नये, याची स्पष्ट जाणीव शिंदे आणि पवार यांनी करून दिली. त्यानंतर फडणवीस यांनी सरकारला अडचणीत आणणाऱ्या मंत्र्यांना कानपिचक्या दिल्या.

मंत्र्यांच्या उलटसुलट विधानांचा परिणाम सरकारच्या प्रतिमेवर होतो. त्यामुळे मंत्र्यांनी बोलताना सतर्कता बाळगावी. जनमानसात तीव्र प्रतिक्रिया उमटेल, अशी विधाने टाळावीत. यापुढे जर सरकारला अडचण निर्माण होईल अशी कृती मंत्र्यांकडून झाली तर मला विचार करावा लागेल. यापूर्वी आपण सगळ्यांनीच शपथ घेतली आहे. शपथ घेऊनही तुम्हाला लाज कशी वाटत नाही, अशा शब्दात फडणवीस यांनी आपला संताप व्यक्त केला.

विधिमंडळ अधिवेशनात भर सभागृहात मोबाईलवर रमी खेळतानाची चित्रफीत समाज माध्यमात व्हायरल झाल्याने अडचणीत सापडलेल्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना अजित पवार यांनी कडक शब्दात समज दिल्याचे कळते. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वी कोकाटे यांनी अजित पवार यांची त्यांच्या दालनात जाऊन भेट घेतली आणि आपली बाजू मांडली. या दोघांची अँटीचेंबरमध्ये चर्चा झाली. यावेळी कोकाटे यांनी आपल्याकडून चूक झाल्याचे मान्य केले. तसेच भविष्यात अशी चूक होणार नसल्याची हमी कोकाटे यांनी अजित पवार यांना दिली. कोकाटे यांनी चूक मान्य केल्यानंतर अजित पवार यांनी त्यांना माफ केले. त्याचवेळी यापुढे तुमची कुठलीही चूक पाठीशी घातली जाणार नसल्याचे अजित पवार यांनी कोकाटे यांना बजावले.

अजेंड्यावरील विषय संपल्यानंतर मुख्य सचिवांसह सर्व अधिकाऱ्यांना बैठकीतून बाहेर काढण्यात आले. अधिकारी बाहेर गेल्यानंतर थेट विषयाला हात घालण्यात आला. सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्र्यांच्या वागणुकीबद्दल नाराजी व्यक्त केली. मंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलताना आपली वर्तणूक चांगली ठेवावी. राज्य सरकार चांगले काम करत असून मंत्र्यांच्या विधानाने त्यावर पाणी फेरता कामा नये, याची स्पष्ट जाणीव शिंदे आणि पवार यांनी करून दिली. त्यानंतर फडणवीस यांनी सरकारला अडचणीत आणणाऱ्या मंत्र्यांना कानपिचक्या दिल्या. मंत्र्यांच्या उलटसुलट विधानांचा परिणाम सरकारच्या प्रतिमेवर होतो. त्यामुळे मंत्र्यांनी बोलताना सतर्कता बाळगावी. जनमानसात तीव्र प्रतिक्रिया उमटेल, अशी विधाने टाळावीत. यापुढे जर सरकारला अडचण निर्माण होईल अशी कृती मंत्र्यांकडून झाली तर मला विचार करावा लागेल अशा शब्दात फडणवीस यांनी आपला संताप व्यक्त केला.

गेल्या काही दिवसांपासून कृषी मंत्री माणिकराव कोकाटे चांगलेच चर्चेत आहेत. त्यांचा सभागृहात जंगली रमी खेळतानाचा फोटो व्हायरल झाला होता. यानंतर विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या प्रकारावरून मुख्यमंत्र्यांनी प्रचंड नाराजी दर्शवली.

# कुपोषणाबाबत सध्याची परिस्थिती काय? समस्या संपणार की नाही?, सरकार आणि याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयाचा सवाल

मुंबई । प्रतिनिधी

मेळघाट आणि राज्याच्या अन्य आदिवासी भागांत काम करू इच्छिणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या सोयीसुविधांकडे प्रशासन लक्ष देत नाही. त्यामुळं कुपोषणाची समस्या आजवर संपलेली नाही. हेच यामागील मुख्य कारण आहे, अशी माहिती याचिकाकर्त्यांच्यावतीनं डॉ. उदय वारूंजीकर यांनी मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात दिली. आदिवासी भागात काम करण्यासाठी शहरातील तज्ज्ञ डॉक्टर जाण्यास तयार होतात. मात्र तिथं त्यांना अनेक गैरसोयींना सामोर जावं लागतं. यावर गेल्या दोन वर्षांत राज्य सरकारनं काय उपाययोजना केल्यात? आणि या भागांत नेमकं काय करण्याची गरज आहे?, याची माहिती सादर करण्याचे निर्देश जारी करत उच्च न्यायालयानं या याचिकेवरील सुनावणी तीन आठवड्यांसाठी तहकूब केली.

राज्यातील दुर्गम भागांत कुपोषणाची समस्या आजही गंभीर आहे. वैद्यकीय सेवेचा अभाव हेच या मागचं मुख्य कारण आहे. अनेक ठिकाणी राहण्याची, खाण्याची सोय होत नाही. वन विभाग, व्याघ्र प्रकल्पांकडे उत्तम गेस्ट हाऊस असूनही तिथल्या डॉक्टरांची परवडच होते. यावरून कागदोपत्री राज्य सरकारकडून डॉक्टरांसाठी सुविधा उपलब्ध होत असल्याचं जरी दिसत असलं, तरी स्थानिक पातळीवर मात्र चित्र काहीसं वेगळं दिसतं. ही वस्तुस्थिती असल्याबद्दल नाराजी व्यक्त करत उच्च न्यायालयानं राज्य सरकारला त्यावर तातडीनं लक्ष देण्याचे आदेश यापूर्वीच दिलेले आहेत.

**काय आहे याचिका?**

आदिवासी आणि दुर्गम भागातील मुलांचा कुपोषणामुळं मृत्यू होण्याचं प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. यासह त्यांच्या इतर समस्यांबाबत डॉ. राजेंद्र बर्मा आणि सामाजिक कार्यकर्ते बंडू साने यांच्यासह डॉ. अभय बंग यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या आहेत. त्यावर मंगळवारी मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या आदिवासींच्या समस्या आणि प्रश्न सोडवण्यास राज्य सरकार प्रयत्नशील असलं तरीही स्थानिक पातळीवरील संबंधित विभागाचे अधिकारी मात्र याबाबत संवेदनशील नाहीत, असं निरीक्षण यावेळी उच्च न्यायालयानं नोंदवलंय. तसंच दोन दशकं उलटून गेली तरी या याचिका अद्याप प्रलंबितच आहेत. त्या कधीतरी निकाली काढायला हव्यात. त्यामुळं पुढील सुनावणीत सर्व याचिकाकर्त्यांशी बोलून एक अंतिम अहवाल सादर करावा असे निर्देश उच्च न्यायालयानं त्यांचे वकील डॉ. उदय वारूंजीकर यांना दिलेत.

**२०२३ मध्ये राज्य सरकारनं सादर केला होता शेवटचा अहवाल**

या सुनावणीदरम्यान राज्य सरकारच्यावतीनं आरोग्य विभागाचे सहाय्यक संचालक दुर्योधन चव्हाण यांनी आपलं २०२३ मध्ये सादर केलेलं प्रतित्रापत्र दाखविलं. सनदी अधिकारी डॉ. दोर्जे यांच्या अहवालावर सर्व याचिकाकर्ते, एनजीओ, डॉ. दोर्जे यांनी एकत्रित बैठक घेऊन आदिवासी भागातील कुपोषण रोखण्यासाठी शिफारसी आणि नवीन उपायांवरही बैठकीत चर्चा झाली होती. त्यानुसार स्त्रीरोग आणि बालरोग तज्ज्ञ डॉक्टरांची रिक्त पदं भरण्याचं काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. कामावर रुजू होण्यास टाळाटाळ करणाऱ्या डॉक्टरांविरोधात कारवाईही सुरू आहे. मात्र मेळघाटमध्ये बालमृत्यू होत असले, तरी हे सर्वच मृत्यू हे कुपोषणामुळं झालेले नाहीत. तर काही मुलांचा मृत्यू न्यूमोनियामुळं झाल्याचा दावाही राज्य सरकारनं केला होता. त्यावर कारण काहीही असो, बालमृत्यू थांबलेत का?, आणि सध्याची नेमकी परिस्थिती काय?, यावर राज्य सरकारला पुढील सुनावणीत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश उच्च न्यायालयानं दिलेत.

**बालविवाह हे देखील कुपोषणाचं एक कारण**

राज्यातील अद्यापही बालविवाह होत असून हे देखील नवजात बालकांमध्ये कुपोषणाचं प्रमाण वाढण्यामागचं एक प्रमुख कारण असल्याचं मुंबई उच्च न्यायालयानं स्पष्ट केलं. दुर्गम आदिवासी जिल्ह्यांत आजही १२-१३ वर्षांच्या मुलींची लग्न लावून दिली जातात. त्यामुळं पुरेसं शिक्षण नसल्यानं त्या १५-१६ व्या वर्षीच गरोदर राहतात. अशावेळी कमी वयात झालेल्या या बाळंतपणातून जन्माला आलेली मुलं लवकर दगावतात. अजूनही राज्यात काही जिल्ह्यात बालविवाह केले जातात. यामध्ये आदिवासी समाजाची पारंपरिक रुढींची मानसिकता असते. पण कायद्यानुसार बालविवाह करण्यावर बंदी आहे. त्यामुळं याबाबतीची जनजागृती त्यांच्यापर्यंत पोहोचायला हवी. पंधराव्या वर्षात आई होणं. हे आई तसंच त्या मुलातील अपरिपक्व आणि अशक्तपणाचं मुख्य कारण आहे. याची जाणीव त्यांना व्हायला हवी, असं मत उच्च न्यायालयानं गेल्या सुनावणीत व्यक्त केलं होतं.

# श्वानांच्या समस्येवर देशव्यापी तोडगा काढा; सुप्रीम कोर्टाचे निर्देश

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

राजधानी दिल्लीत एका ६ वर्षीय मुलीचा रेबीजमुळे झालेल्या दुर्दैवी मृत्यूनंतर, देशभरात गंभीर बनलेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येची आणि त्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या घटनांची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. ही परिस्थिती 'अत्यंत चिंताजनक आणि अस्वस्थ करणारी' असल्याचे नमूद करत न्यायालयाने या प्रकरणी सुनावणी सुरू केली आहे. या समस्येवर देशव्यापी तोडगा काढण्याचे संकेत दिले आहेत.

दिल्लीतील एका हृदयद्रावक घटनेनंतर सर्वोच्च न्यायालयाला या प्रकरणात हस्तक्षेप करावा लागला. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने दखल घेतली. दिल्लीच्या पूठ कलान परिसरातील छवी शर्मा या ६ वर्षांच्या चिमुकलीचा ३० जून रोजी एका पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता. त्यानंतर तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले, मात्र उपचारांनंतरही तिलारेबीजचा संसर्ग झाला. यात २६ जुलै रोजी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. वेळेवर आणि योग्य उपचारांचा अभाव तसेच भटक्या कुत्र्यांच्या समस्येचे भीषण परिणाम या घटनेमुळे अधोरेखित झाले.

**शहरी, निमशहरी भागात उच्छाद :**

आपल्या आदेशात न्यायालयाने म्हटले आहे की, 'शहरावर भटक्या कुत्र्यांचे संकट आणि त्याची किंमत मोजणारी मुले' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेले वृत्त अत्यंत त्रासदायक आहे. शहरी आणि निमशहरी भागांतून कुत्र्यांच्या चावण्याच्या शेकडो घटना समोर येत आहेत, ज्यामुळे अनेकदा रेबीजचा संसर्ग होतो. लहान मुले आणि वृद्ध या जीवघेण्या आजाराला बळी पडत आहेत. न्यायमूर्ती पारडीवाला यांनी या प्रकरणाची स्वतःहून दखल घेत असल्याचे स्पष्ट केलं. या प्रकरणाला 'स्वतःहून दाखल केलेली रिट याचिका' म्हणून हाताळण्याचे निर्देश न्यायालयाच्या नोंदणी विभागाला दिले. पुढील निर्देशांसाठी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांच्यासमोर ठेवण्यात येणार आहे.

**एक दिवस मॉर्निंग वॉकला जाऊन बघा**

विशेष म्हणजे १५ जुलै रोजी, दुसऱ्या एका खंडपीठाने भटक्या कुत्र्यांना खाद्य पुरवण्याच्या मुद्यावर आणि सार्वजनिक सुरक्षेवर चिंता व्यक्त केली होती. नोएडा शहरात भटक्या कुत्र्यांना खाद्य जागा देण्यासाठी निश्चित ठरवण्याची मागणी करणारी याचिका न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर आली होती. त्यावर खंडपीठाने याचिकाकर्त्याला तुम्ही सकाळी सायकलिंगला जाता का? एक दिवस जाऊन बघा, म्हणजे काय होतं ते कळेल, असं म्हणत सुनावलं होतं. सायकलस्वार, सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांना आणि दुचाकीचालकांना निर्जन रस्त्यांवर आणि उद्यानांमध्ये भटक्या कुत्र्यांपासून कसा धोका असतो, याकडे न्यायालयाने लक्ष वेधलं होतं.न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले होते की, प्राण्यांसाठी जागा आहे, पण माणसांसाठी नाही. भटक्या कुत्र्यांना आणि गायींना खायला घालणाऱ्या उदारमतवादी लोकांसाठी आम्ही प्रत्येक रस्त्यावर वेगळी लेन तयार करायची का?

# अजितदादांची दादागिरी चालत नाही, त्यांच्या काही गोष्टी कोकाटेंकडे.; बच्चू कडूंनी काय केला दावा?

अमरावती । प्रतिनिधी

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे आपल्या वादग्रस्त वक्तव्यासाठी ओळखले जातात. नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात माणिकराव कोकाटे हे मोबाइलवर रमी गेम खेळत असतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यानंतर विरोधकांनी कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. मात्र व्हायरल व्हिडीओ प्रकरणी खुलासा करताना कोकाटे यांनी शेतकरी नाही तर, शासनच भिकारी असल्याचे वादग्रस्त विधान केले आणि नव्या वादाला तोंड फुटले. यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इजा झालं, बिजा झालं आता तिजाची वेळ देऊ नका, असा इशारा मी त्यांना आधीच दिला होता, असे म्हटले होते. तसेच कोकाटे यांच्यासोबत चर्चा करून निर्णय घेईल, असेही स्पष्ट केले होते. मात्र आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांची भेट घेतल्यानंतरही माणिकराव कोकाटे यांचं मंत्रीपद जाणार नसल्याची माहिती समोर येत आहे. याचपार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे.

माध्यमांशी संवाद साधताना बच्चू कडू यांना माणिकराव कोकाटे यांच्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, काय गेम फसलाय मला माहिती नाही. एकतर माणिकराव कोकाटे यांच्याकडे अजित पवारांच्या काही गोष्टी लपल्या असतील



म्हणून ते धाडस करत नाहीत. तसेच अजित पवारांची दादागिरी आजकाल चालत नाही. सरकारमध्येही नाही आणि पक्षामध्येही त्यांची दादागिरी चालत नाही, असंही दिसत आहे. दोन-तीन गोष्टी तपासल्या तर अजित पवार यांचं कोणी ऐकत नाही, हेच दिसतंय, असंही बच्चू कडू म्हणाले. त्यामुळे आता बच्चू कडू यांच्या वक्तव्यावर अजित पवार किंवा माणिकराव कोकाटे काय उत्तर देतात हे पाहावे लागेल.

राज्य मंत्रिमंडळाच्या अजेंड्यावरील विषय संपल्यानंतर मुख्य सचिवांसह सर्व अधिकाऱ्यांना बैठकीतून बाहेर काढण्यात आले. अधिकारी बाहेर गेल्यानंतर थेट विषयाला हात घालण्यात आला. सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्र्यांच्या वागणुकीबद्दल नाराजी व्यक्त केली. मंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलताना आपली वर्तणूक चांगली ठेवावी. राज्य सरकार चांगले काम करत असून मंत्र्यांच्या विधानाने त्यावर पाणी फेरता कामा नये, याची स्पष्ट जाणीव शिंदे आणि पवार यांनी करून दिली. त्यानंतर फडणवीस यांनी सरकारला अडचणीत आणणाऱ्या मंत्र्यांना कानपिचक्या दिल्या. मंत्र्यांच्या उलटसुलट विधानांचा परिणाम सरकारच्या प्रतिमेवर होतो. त्यामुळे मंत्र्यांनी बोलताना सतर्कता बाळगावी. जनमानसात तीव्र प्रतिक्रिया उमटेल, अशी विधाने टाळावीत. यापुढे जर सरकारला अडचण निर्माण होईल अशी कृती मंत्र्यांकडून झाली तर मला विचार करावा लागेल. यापूर्वी आपण सगळ्यांनीच शपथ घेतली आहे. शपथ घेऊनही तुम्हाला लाज कशी वाटत नाही, अशा शब्दात फडणवीस यांनी आपला संताप व्यक्त केला.

पान १ वरुन

## 'वादग्रस्त विधानं, कृती खपवून

**अजित पवारही कोकाटेंवर नाराज**

गेल्या काही दिवसांपासून कृषी मंत्री माणिकराव कोकाटे चांगलेच चर्चेत आहेत. त्यांचा सभागृहात जंगली रमी खेळतानाचा फोटो व्हायरल झाला होता. यानंतर विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या प्रकारावरून मुख्यमंत्र्यांनी प्रचंड नाराजी दर्शवली. आता दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार हेदेखील माणिकराव कोकाटे यांच्यावर नाराज असल्याचं बोललं जातं आहे. बैठकीत अजित पवारांनीही कोकाटेंचे कान टोचले आहेत. असं वारंवार चालणार नाही. ही तुम्हाला शेवटची संधी असेल, असं अजित पवारांनी म्हटल्याची माहिती समोर आली आहे.

**राजीनामा घेऊ नये, यासाठी शिष्टमंडळानं घेतली भेट**

तसेच, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेऊ नये, यासाठी शेतकऱ्यांच्या एका शिष्टमंडळानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. यावर हा विषय आता माझ्या हातात नसल्याचं उत्तर अजित पवारांनी या शिष्टमंडळाला दिलं. त्यांच्या वक्तव्यामुळे सरकारची प्रतिमा खूप मलिन झाली आहे, असंही अजित पवारांनी म्हटलं.

## ज्यांनी चुकीच्या पद्धतीनं लाभ

शासन कटिबद्ध आहे, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

**क्रॉस व्हेरिफिकेशनची प्रक्रिया सुरू**

पुढं आदिती तटकरे म्हणाल्या की, जे काही आकडे त्या ठिकाणी समोर येतायेत, हे माध्यम किंवा जे काही विरोधकांनी कुठल्याही पद्धतीचा क्रॉस व्हेरिफिकेशन केलेलं नाही. २६ लाखांचा डेटा जर आयटी डिपार्टमेंटकडून आलेला आहे. आम्हालाही त्या ठिकाणी त्याचं क्रॉस व्हेरिफिकेशन करायचं आहे. जसं जानेवारी महिन्यामध्ये कृषी विभागानं नमो शेतकरीचा ज्या वेळेला डेटा आमच्याकडे दिला. आम्ही एक महिन्याचा कालावधी घेतला. क्रॉस व्हेरिफाय करायला ज्या वेळेला सात-साडेसात लाखाचा डेटा त्यांनी दिला, त्यावेळेला त्यातील पाच लाख खरंच शेतकरी लाभार्थी आहेत, हे सांगितलं. त्याच्यामुळे जो काही हा २६ लाखांचा डेटा आलेला आहे. याचा क्रॉस व्हेरिफिकेशन करण्याची आमची प्रक्रिया सुरू आहे. ही अगदी ग्राउंड लेव्हलपर्यंत होणार आहे. त्याच्यातून किती आकडे समोर येतात हे समजेल. मात्र जे पात्र आहेत, त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचला पाहिजे. पात्र व्यक्ती अपात्र ठरता कामा नये. पात्र लोकांना याचा लाभ मिळाला पाहिजे आणि ज्यांनी चुकीच्या पद्धतीने लाभ घेतला आहे, त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी सरकार नक्कीच पाऊले उचलेल, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं.

## रोहित पवारांची परळीत महादेव मुंडे

दाखल झाले होते. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची व मुलांची विचारपूस करताना केली. बीड जिल्ह्याच्या परळी येथील मयत व्यापारी महादेव मुंडे यांचा निर्घृण खून करण्यात आला होता या खुनाला तब्बल २१ महिने उलटून गेली अद्याप खुनातील आरोपी पोलिस अधिकाऱ्यांना निष्पन्न करता आले नाही म्हणून महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी विविध प्रकारची आंदोलने केली मात्र अद्याप म्हणावा तसा प्रतिसाद पोलिस प्रशासनाच्या वतीने दिला जात नाही याचा खेद ज्ञानेश्वरी मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

**वाल्मीक कराड यांना जमीन पाहिजे**

यावेळी झालेल्या झालेल्या घटनेचा घटना क्रम रोहित पवार यांनी ऐकला वाल्मीक कराड यांना जमीन पाहिजे म्हणून हा प्रकार झाला असे ही सांगण्यात आले. पोलिस निरीक्षक साबळे यांना परत खुनाच्या तपासात परत बोलवा एस आय टी मध्ये साबळे सरांना घेण्यात यावे त्यांना पूर्ण अधिकार देण्यात यावे अशी मागणी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी अशी मागणी यावेळी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी रोहित पवार यांच्याकडे केली. तसेच पंकज कुमावत यांना ही केस तपासामध्ये घेण्यात यावं.

**माझ्या मुलांनी अंत्यविधी वेळी शपथ घेतली**

तर वाल्मीक कराड याला पी सी आर मध्ये घेण्यात यावं, त्याचे मूळ त्यांचे सहकारी यांना तत्काळ अटक करा अशी मागणी ही मुंडे परिवाराच्या वतीने करण्यात आली.

तर आरोपींची नार्को टेस्ट करणे आवश्यक आहे. केस मध्ये खूप महिने होऊन गेले आहेत..माझ्या मुलांनी अंत्यविधी वेळी शपथ घेतली आहे माझ्या वडिलांच्या मारेकऱ्याला मी मारणार. अशी भावना माझ्या मुलात निर्माण झाली आहे.. आता आरोपी निष्पन्न झाले आहेत त्यांना मात्र पकडले जात नाही. अद्याप माझा जवाब देखील घेतला नाही अशी खंत ज्ञानेश्वरी मुंडे यांनी म्हंटले आहे.

**बेटा तुझे वडील स्वच्छ व्यवसाय करणारे, आईमध्ये खूप धाडस**

आता तुमच्यावर कोणी प्रेशर करणार नाहीत आता तुमच्या सोबत सर्व लोक आहेत आम्ही पण आहोत. बेटा तुझे वडील स्वच्छ व्यवसाय करणारे होते. बदला घेण्याचे काढून टाक असे आवाहन ही या वेळी रोहित पवार यांनी केले. मात्र जे अधिकारी या खुनाच्या तपासात होते त्याच्या बदल्या करून त्यांचे प्रमोशन करण्यात आले. मात्र खुनातील आरोपी निष्पन्न कोणी केलेच नाही. तुझ्या आई मध्ये खूप धाडस आहे म्हणून आज येवढ्या लोकांना फाईट देत आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून,

माध्यमातून २० गंभीर आजारांवर मदत केली जाते: त्यात, कॉक्लियर इम्प्लांट, हृदयविकार, किडनी/लिव्हर/बोन मॅरो प्रत्यारोपण, कर्करोग, अपघात, नवजात बालकांचे आजार, मेंदू विकार, डायालिसिस, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात आदींचा समावेश आहे.

**जिल्हा कक्षाच्या माध्यमातून मदत**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (उच् ऊर्शींशपवीर ऋरवपरींळी) यांच्या सुचनेनुसार पेपरलेस आणि डिजिटल प्रणाली तसेच जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. ज्यामुळे रुग्णांना मंत्रालयात येण्याची गरज भासत नाही. रुग्णांनी प्रथम महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ घ्यावा. जर या योजनांद्वारे उपचार शक्य नसतील, तर, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे संलग्न असणाऱ्या रुग्णालयातून अर्ज करता येतो. यामुळे शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होतो आणि निधीचा उपयोग खऱ्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचतो.

**आवश्यक कागदपत्रे :-**

आधार कार्ड, रेशन कार्ड

उत्पन्नाचे प्रमाणपत्र (१.६० लाखांपेक्षा कमी)

वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र

रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असावी

अपघात असल्यास एफआयआर किंवा एमएलसी

अवयव प्रत्यारोपण असल्यास झेडटीसीसी नोंदणी पावती

सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात aao.cmrf-mhgov.in या ईमेल वर पाठवावीत. अधिक माहिती करिता टोल फ्री क्र. १८०० १२३ २२११ या क्रमांकावर कॉल करावा.

# ‘निष्पापांच्या रक्तावर काँग्रेसचे राजकारण’, पीएम मोदींनी संसदेतच काढले वाभाडे

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशावर बोलताना पाकिस्तानला अत्यंत सडेतोड आणि थेट इशारा दिला आहे. भारताने पाकिस्तानच्या अणुबॉम्बच्या धमक्या पोकळ ठरवल्या असून, यापुढे असे ब्लॅकमेलिंग खपवून घेतले जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. या कारवाईत पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले असून, त्यांचे अनेक हवाई तळ आजही ‘खउण’ मध्ये असल्याची महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी दिली.

लोकसभेत 'ऑपरेशन सिंदूर'वर निवेदन देताना पंतप्रधानांनी भारताच्या नव्या आणि कणखर परराष्ट्र धोरणाचे चित्र स्पष्ट केले. भारताने हे सिद्ध केले आहे की अणुबॉम्बचे ब्लॅकमेलिंग आता चालणार नाही आणि भारत अशा धमक्यांपुढे कधीही झुकणार नाही, असे त्यांनी निक्षून सांगितले.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस पक्षावर अत्यंत गंभीर आणि थेट शब्दांत टीका केली आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यासारख्या संवेदनशील प्रसंगी काँग्रेस पक्ष जबाबदारीने वागण्याऐवजी 'बालिशपणा' करत होता आणि निष्पापांच्या हत्येवर राजकारण करत होता, असा घणाघाती आरोप पंतप्रधानांनी केला.

संसदेत निवेदन देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ‘पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर काँग्रेस पक्ष केवळ आनंद लुटत होता. देशावर आलेल्या संकटाचे गांभीर्य ओळखण्याऐवजी, निष्पाप नागरिकांच्या हत्येवर काँग्रेसकडून राजकारण केले जात होते.’

आपल्या भाषणात त्यांनी काँग्रेसच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ‘काँग्रेसचा हा निव्वळ बालिशपणा होता.’ अशा राष्ट्रीय संकटाच्या वेळी संपूर्ण देशाने एकत्र येणे अपेक्षित असताना, विरोधी पक्षाकडून केली जाणारी ही कृती अत्यंत खेदजनक असल्याचे पंतप्रधानांच्या विधानातून ध्वनित झाले.

**दहशतवादी तळ जमीनदोस्त, हवाई तळांचे मोठे नुकसान**

या कारवाईत पाकिस्तानमधील दहशतवादी तळांचे कसे कंबरडे मोडले, याची माहिती देताना पंतप्रधान म्हणाले, पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. बहावलपूर, मुरिदके यांसारख्या ठिकाणी कोणी पोहोचू शकेल, याची कल्पनाही कोणी केली नव्हती. आपल्या सैन्याने ते तळ जमीनदोस्त केले.

ते पुढे म्हणाले, पाकिस्तानच्या हवाई तळांचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. आणि



आजतागायत त्यांचे अनेक हवाई तळ ‘खउण’ मध्ये आहेत.

**आत्मनिर्भर भारताच्या सामर्थ्याचे जगाला दर्शन**

या कारवाईने भारताची तांत्रिक क्षमता जगासमोर आणली आहे, असेही पंतप्रधानांनी नमूद केले. भारताच्या अचूक हल्ला करण्याच्या क्षमतेवर ते म्हणाले, भारताने आपली तांत्रिक क्षमता दाखवून दिली आहे. पाकिस्तानच्या छातीवर अचूक हल्ला केला आहे.

तंत्रज्ञानावर आधारित युद्धाचे महत्त्व स्पष्ट करताना ते म्हणाले, हे तंत्रज्ञानावर आधारित युद्धाचे युग आहे. गेल्या १० वर्षांत आपण जी तयारी केली, ती केली नसती, तर या युगात आपले किती नुकसान झाले असते, याची आपण कल्पना करू शकतो.

'ऑपरेशन सिंदूर' हे आत्मनिर्भर भारताच्या सामर्थ्याचे प्रतीक असल्याचे सांगत पंतप्रधान म्हणाले, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून, जगाने प्रथमच आत्मनिर्भर भारताचे सामर्थ्य ओळखले. मेड इन इंडिया ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानची शस्त्रप्रणाली उघडी पाडली, अशा शब्दांत त्यांनी स्वदेशी तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले.

लोकसभेत ‘ऑपरेशन सिंदूर’वर झालेल्या चर्चेदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कारवाईचे वर्णन भारताचा ‘विजयोत्सव’ असे केले.

**२२ मिनिटांत सूड, दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर : पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहासमोर भारताची बाजू मांडताना ‘ऑपरेशन सिंदूर’मागील संपूर्ण घटनाक्रम सविस्तरपणे सांगितला.

ते म्हणाले, ‘२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेली क्रूर घटना, जिथे दहशतवाद्यांनी निष्पाप लोकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या, ती क्रूरतेची परिसीमा होती. भारताला हिंसाचाराच्या आगीत ढकलण्याचा हा एक सुनियोजित प्रयत्न होता. देशात दंगली घडवण्याचा हा कट होता. मी देशवासियांचे आभार मानतो की त्यांनी एकजुटीने तो कट उधळून लावला.’

कारवाईच्या निर्णयावर बोलताना पंतप्रधान म्हणाले, ‘२२ एप्रिल रोजी मी विदेशात होतो, मात्र घटनेची माहिती मिळताच मी तातडीने परतलो. परत येताच मी एक बैठक बोलावली आणि दहशतवादाला चोख प्रत्युत्तर द्यायचे, हा आमचा राष्ट्रीय संकल्प असल्याचे स्पष्ट निर्देश दिले. लष्कराला कारवाईसाठी पूर्ण मोकळीक देण्यात आली. कारवाई कधी, कुठे, कशी आणि कोणत्या पद्धतीने करायची, याचा निर्णय लष्करानेच घ्यावा, असे त्या बैठकीत स्पष्टपणे सांगण्यात आले होते.’

या कारवाईचे वर्णन करताना ते पुढे म्हणाले, ‘पहलगाम हल्ल्यानंतर भारताकडून मोठी कारवाई होईल, अशी कल्पना पाकिस्तानला होती. त्यांनी अणुबॉम्बच्या धमक्या देण्यास सुरुवात केली. मात्र, ६ आणि ७ मे च्या मध्यरात्री, ठरल्याप्रमाणे भारताने कारवाई केली आणि पाकिस्तान काहीही करू शकला नाही. आपल्या सशस्त्र दलांनी २२ एप्रिलच्या हल्ल्याचा बदला केवळ २२ मिनिटांत अचूक हल्ले करून घेतला.’

‘आम्हाला अभिमान आहे की दहशतवाद्यांना शिक्षा झाली; आणि अशी शिक्षा झाली की त्या दहशतवादी सूत्रधारांची झोप आजही उडालेली आहे. मी म्हटले होते की हे अधिवेशन भारताच्या 'विजयोत्सवा'चे आहे... आणि हा 'विजयोत्सव' म्हणजे दहशतवादी तळांना मातीत मिळवण्याचा आहे,’ असे पंतप्रधानांनी सांगितले.

# ट्रम्प खोटे बोलत असतील तर मोदींनी हे सभागृहात सांगावे..; राहुल गांधींनी मोदींना दिल चॅलेंज

नवी दिल्ली । वृत्तसेवा

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवरून सरकारवर जोरदार हल्ला चढवला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लष्कराला मोकळीक न देण्याच्या आणि युद्धबंदीच्या दाव्यांवरून त्यांनी सरकारला कोंडीत पकडले. राहुल गांधी यांनी त्यांना आव्हान देत म्हटले की, जर ट्रम्प यांचा दावा चुकीचा असेल तर पंतप्रधान मोदींनी हे सभागृहात सांगावे.

राहुल म्हणाले की, पहलगाममध्ये जे काही घडले ते चुकीचे होते, आपण सर्वांनी त्याचा निषेध केला आहे. आपण भारतीयांना वेदना होतात. पण तुम्हाला राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. राहुल गांधी म्हणाले की, लष्कराला मोकळीक देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती नसावी. लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. जर सतत युद्धबंदीचा दावा करणारे डोनाल्ड ट्रम्प खोटे बोलत असतील तर पंतप्रधान मोदींनी हे सभागृहात सांगावे.



राहुल गांधी म्हणाले की, राजनाथ सिंह यांनी १९७१ आणि ऑपरेशन सिंदूरची तुलना केली. इंदिरा गांधींनी सॅम माणेकशॉ यांना मोकळीक दिली होती. पण ७ व्या फ्लीटच्या आगमनानंतरही ऑपरेशन सुरूच राहिले. एक लाख पाकिस्तानी सैनिकांनी आत्मसमर्पण केले. जर पुढचा दहशतवादी हल्ला झाला तर पाकिस्तानवर हल्ला होईल का?

पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर होते, पण ते ट्रम्पसोबत जेवण करत होते. भारताचे परराष्ट्र धोरण पाकिस्तान-चीनवर केंद्रित असले पाहिजे. चीन पाकिस्तानला गुप्तचर माहिती पुरवत आहे. ते त्याला मदत करत आहे. पाकिस्तानला आमच्या विमानांची संपूर्ण माहिती मिळत होती. सरकारचे परराष्ट्र धोरण अपयशी ठरले आहे. आमचे ध्येय पाकिस्तान आणि चीनला वेगळे करणे असले पाहिजे.

राहुल गांधी म्हणाले की, संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की आमचे ध्येय दहशतवादी संरचना नष्ट करणे आहे. आमचे लक्ष्य लष्करी तळ नव्हते. संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की आम्हाला लढाई वाढवायची नाही. आम्ही कुठे हल्ला केला हे पाकिस्तानला सांगण्यात आले. ऑपरेशन सिंदूर फक्त २२ मिनिटे चालले. सरकारने पाकिस्तानसमोर शरणागती पत्करली. डीजीएमओला पाकिस्तानच्या डीजीएमओला युद्धबंदीसाठी विचारण्यास सांगण्यात आले.

तुम्ही पाकिस्तानला सांगितले की आम्हाला लढायचे नाही. सरकारने वैमानिकांचे हात बांधले होते. पाकिस्तानला माहिती दिल्यानंतर लढाऊ विमाने पाठवण्यात आली. सर्वांना निकाल माहित आहे, पण सरकार सांगू इच्छित नाही. सीडीएस म्हणाले की, प्रश्न विमाने पडली का हा नाही. प्रश्न हा आहे की विमाने का पडली. त्यांच्या विधानावरून असे दिसून येते की सैन्याचे हात बांधलेले होते.

राहुल गांधी म्हणाले की, परराष्ट्रमंत्र्यांना युद्धाचे मूलभूत ज्ञान नाही. जगातील देशांनी दहशतवादाचा निषेध केला. कोणीही पाकिस्तानचा निषेध केला नाही. जर तुम्ही माझे ऐकले असते तर ५ जेट विमाने पडली नसती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २९ वेळा युद्धबंदी आणल्याचे म्हटले आहे. जर हे चुकीचे असेल तर पंतप्रधान मोदींनी सभागृहात निवेदन द्यावे.

# उमेद मॉलची उभारणी, ई-नाम योजनेत सुधारणा, अन् स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांना पुरस्कार; मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचे निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान', 'उमेद मॉल'ची उभारणी, 'ई-नाम' योजनेत सुधारणा, महिलांवरील अत्याचारासाठी विशेष न्यायालय, पिंपरी-चिंचवड येथे नवीन न्यायालय, वर्धा जिल्ह्यातील प्रकल्पांसाठी निधी आणि वकील परिषदेला जमीन देणे, अशा निर्णयांचा समावेश आहे.

'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना'त उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांमधील १ हजार ९०२ जणांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चांगलं काम करणाऱ्या व्यक्तींना आणखी बळ मिळणार आहे. तर दुसरीकडे, सरकारकडून 'उमेद' अंतर्गत १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारले जातील. यामुळे ग्रामीण भागातील महिला बचत गटांना त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ मिळण्यास मदत होणार आहे. 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन होणार असून त्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

गोंदिया, रत्नागिरी आणि वाशिम येथे महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे लवकर निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय सुरू होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्यातील बोर मोठा आणि धाम मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी अनुक्रमे २३१ कोटी ६९ लाख आणि १९७ कोटी २७ लाख रुपयांची तरतूद मंत्रिमंडळ बैठकीतून करण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेला डव्होकेट अकॅडमीसाठी ठाणे जिल्ह्यातील कळवा येथे जमीन देण्यास मान्यता मिळाली आहे. बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्र्यांनी फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक विजेत्या ग्रँण्डमास्टर दिव्या देशमुख यांचे अभिनंदन करण्यात आले.

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे सोशल मीडिया परिपत्रक रद्द करा

चंद्रपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या २८ जुलै २०२५ रोजीच्या सोशल मीडिया वापरासंदर्भातील परिपत्रकामुळे नवा वादनिर्माण झाला आहे. हे 'जुलमी' परिपत्रक तात्काळ रद्द करावे, अशी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. हे परिपत्रक शासकीय कर्मचाऱ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट गदा आणणारे असून, लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

खासदार धानोरकर यांनी, यातील 'प्रतिकूल टीका करू नये' किंवा 'स्वयं-प्रशंसा होणार नाही' यांसारख्या अटी अत्यंत जाचक असल्याचे म्हटले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांवर अनावश्यक दबाव येईल आणि त्यांची सर्जनशीलता मारली जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. गोपनीय माहितीचा प्रसार रोखणे आवश्यक असले तरी, त्याचा अर्थ



अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेणे नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. हे केवळ एक परिपत्रक नसून, संविधानाने दिलेल्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रकार आहे, असे नमूद करत, कर्मचाऱ्यांच्या घटनात्मक अधिकारांसाठी आपण लढा देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९' च्या आधारावर हे परिपत्रक काढले आहे. गोपनीय माहितीचा प्रसार, खोटी माहिती पसरवणे आणि राजकीय,शासकीय धोरणांवर प्रतिकूल अभिप्राय व्यक्त करण्याच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणे हा यामागील उद्देश आहे. यात प्रतिकूल टीका टाळणे, वैयक्तिक व कार्यालयीन सोशल मीडिया खाते स्वतंत्र ठेवणे, बंदी घातलेल्या प्सचा वापर न करणे आणि गोपनीय दस्तऐवज शेअर न करणे अशा अनेक अटींचा समावेश आहे. या सूचनांचा भंग केल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असेही नमूद आहे.

खासदार धानोरकरांनी हे परिपत्रक तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून शासकीय कर्मचाऱ्यांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहील आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण होईल. या मागणीवर राज्य सरकारची भूमिका काय राहते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पुणे ड्रग्स प्रकरण : प्रांजल खेवलकरांना अडकवण्यासाठी ईशा सिंगचा वापर, विजयसिंह ठोंबरेंचा युक्तिवाद

पुणे । प्रतिनिधी

दोन दिवसांपूर्वी पुण्यातील उच्चभ्रू खराडी भागात हाउस पार्टीच्या नावाखाली ड्रग्स पार्टी आयोजित करण्यात आली होती. या पार्टीवर पोलिसांनी छापेमारी केली आणि एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल मनिष खेवलकर यांच्यासह ६ जणांना अटक केली. आज (२९ जुलै) या सर्व आरोपींची पोलीस कोठडी संपली. यानंतर, न्यायालयात झालेल्या युक्तिवादानंतर २ महिला आरोपींना न्यायालयीन कोठडी तर इतर ५ आरोपींना २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या ५ आरोपींमध्ये प्रांजल खेवलकर, निखील पोपटाणी, समीर सय्यद, सचिन भोंबे आणि श्रीपाद यादव यांचा समावेश आहे.

पुणे ड्रग्स प्रकरणातील ७ आरोपींना आज पोलिसांनी शिवाजीनगर सत्र न्यायालयात हजर केलं. न्यायालयात झालेल्या युक्तिवादात तपास अधिकाऱ्यांनी सांगितलं की, सर्व आरोपींच्या घरी छापेमारी करण्यात आली आहे, ज्यात अनेक इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस हस्तगत झाले आहेत. तसेच, ब्लड आणि लघवीचे सँपल लॅबकडे पाठवले असून, त्यांचे अहवाल येणं बाकी आहे. याशिवाय, राहुल नावाचा एक नवीन आरोपी निष्पन्न झाला आहे. जो हुक्का भरत होता, त्याचा शोध सध्या सुरू आहे. तपासात समोर आलं की, हा आरोपी तीन दिवस त्याच ठिकाणी होता.



त्याचबरोबर, पार्टीमध्ये अंमली पदार्थ कुठून आणले, याबाबत विचारलं असता, आरोपी एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. आरोपी तपासात सहकार्य करत नाहीत.

तसेच, तपास अधिकाऱ्यांनी या प्रकरणी दोन महिलांना न्यायालयीन कोठडी आणि इतर ५ आरोपींना पोलीस कोठडी द्यावी, अशी मागणी न्यायालयात केली होती. यावर प्रांजल खेवलकर यांचे वकील विजयसिंह ठोंबरे यांनी युक्तिवादात म्हटलं की, आमच्यावर ट्रॅप करण्यात आला आहे. आज तपासात काहीच प्रगती नाही. रिमांड रिपोर्टमध्ये सांगितलं आहे की, सीझ करायचं आहे, पण ते काय, हे पोलिसांना माहिती नाही. या प्रकरणात मुलींना त्या ठिकाणी पाठवून ट्रॅप रचण्यात आला आहे. टेबलवर महिलांची बॅग होती, त्यात अंमली पदार्थ सापडले आहेत. ते कोकेन असल्याचं सांगितलं जात आहे, ही पावडर ईशा सिंग हिनं आणली होती आणि तिला आम्ही पाठवलं होते का, हे विचारलं पाहिजे.

**इशा सिंगला प्लांट करण्यात आलं होतं**

तसेच, राजकीय हेतूसाठी हे सगळं केलं जात आहे, आणि व्हिडिओ व्हायरल केले जात आहेत. ईशा सिंग हिच्या पर्समधे सिगारेटच्या रिकाम्या पाकीटात कोकेन सापडले आहे. इशा सिंगला प्लांट करण्यात आलं होतं. पोलीस आता त्या दोन महिला आरोपींना पोलीस न्यायालयीन कोठडीची मागणी करत आहेत आणि प्रांजल खेवलकर यांची मात्र पोलीस कोठडी मागत आहेत. प्रांजल खेवलकर यांनी अंमली पदार्थांच सेवन केलेलं नाही आणि त्यांच्याकडे अंमली पदार्थ सापडलेले देखील नाहीत. दरम्यान, यावेळी न्यायालयात डॉ. प्रांजल खेवलकर यांची पत्नी रोहिणी खडसे यादेखील युक्तिवाद करण्यासाठी उपस्थित होत्या.

# मी पुणे पोलिसांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करणार-एकनाथ खडसे

पुणे । प्रतिनिधी

दोन दिवसांपूर्वी पुण्यातील उच्चभ्रू खराडी भागात हाऊस पार्टीच्या नावाखाली ड्रग्स पार्टीवर पोलिसांनी छापेमारी करत एकूण ७ जणांना ताब्यात घेतलं आहे. यात एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल मनीष खेवलकर यांच्यासह ६ जणांनादेखील अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी आज ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी पत्रकार परिषद घेत पोलिसांनी माझी बदनामी करण्यासाठी हे केलं असून, मी पुणे पोलिसांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

पुण्यात आज ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती, यावेळी त्यांनी याबाबत माहिती दिली. यावेळी एकनाथ खडसे म्हणाले की, पुणे पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी एका रेव्ह पार्टीवर छापा टाकत एकनाथ खडसे यांच्या जावयाला अटक केली. पोलिसांना माझे काही प्रश्न आहेत की रेव्ह पार्टीची व्याख्या काय आहे. याला रेव्ह पार्टी म्हणता येते का? तिथं ना डान्स होता, ना म्युझिक होती. विनाकारण आम्हाला बदनाम केलं जात आहे का? कारण पोलिसांनी खासगी ठिकाणाचे व्हिडीओ काढून ते माध्यमांना दिले हे पोलिसांनी बदनामी करण्यासाठी केलेलं कृत्य आहे.

**खेवलकर यांना पहिले आरोपी का केलं?**

तसेच या प्रकरणी डॉ. प्रांजल खेवलकर यांना पहिले आरोपी का करण्यात आलंय. पोलिसांनी जे चित्रीकरण दाखवलं आहे, त्यात महिलेच्या पर्समध्ये अंमली पदार्थ सापडलेत. तरीही प्रांजल खेवलकर यांना पहिलं आरोपी करण्यात आलं



आहे. विनाकारण आम्हाला बदनाम करण्यात आलं आहे. तसेच डॉक्टरांनी जो रिपोर्ट दिला तो मीडियाकडे कसा आला. गेल्या काही प्रकरणात ससूनचं नाव खराब झालं असून, जे रक्ताचे नमुने घेण्यात आलेत त्याबाबत छेडछाड होऊ शकते. अलीकडे ससूनचं नाव खराब आहे म्हणून या सगळ्या प्रकरणाची सीसीटीव्ही फुटेज मागणार आहे, असं यावेळी खडसे म्हणाले.

**माझ्यावर पाळत ठेवण्यात आली**

ते पुढे म्हणाले की, माझ्या जावयाने सांगितलं आहे की, मी आयुष्यात कधीही ड्रग्स घेतले नाहीत. माझ्यावर पाळत ठेवण्यात आली. सिव्हिल ड्रेसमध्ये असलेले पोलीस पाळत ठेवत होते. वेस्टिन हॉटेलमध्येदेखील पोलीस आले होते आणि तेच पोलीस पाळत ठेवत होते. पोलीस एवढी तत्परता दाखवत असतील तर हनी ट्रॅपबाबत का दाखवत नाहीत. नाशिकमध्ये बलात्काराची घटना घडली आहे, तिथं शासनाकडून एवढी तत्परता दाखवली जात नाही. हे सगळं प्लॅन करून खडसे यांना बदनाम केलं जात आहे. पोलिसांनी व्हिडीओ काढून माध्यमांना दिले कसे? याची सखोल चौकशी व्हावी, अशी आमची मागणी आहे. तसेच काहीही झालं तरी सत्य समोर येणार आहे. आमचा लढा हा चालू राहणार आहे. हनी ट्रॅपबाबत सरकार का उत्तर देत नाही, तसेच सरकार त्या सीडीबाबत उत्तर का देत नाही. या प्रकरणानंतर मी पोलिसांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करणार आहे, असंही यावेळी खडसे म्हणाले.

**पत्रकार परिषद सुरू असताना साध्या वेषात पोलीस आले**

यावेळी पत्रकार परिषद सुरू असताना साध्या वेषात काही पोलीस हे पत्रकार परिषदेमध्ये आले होते, यानंतर ही बाब खडसे यांच्या लक्षात आल्यानंतर ते म्हणाले की, माझी पत्रकार परिषद सुरू असताना साध्या वेषात पोलीस आले. माझ्या घराच्या बाहेर आताही पोलीस आहेत. माझ्या छातीवर बसण्याचा हे प्रयत्न करीत आहेत. माझा सरकारला सवाल आहे की, माझ्यावर पाळत का ठेवली जातेय. माझा आरोप आहे की रेव्ह पार्टी हे ठरवून केलेलं षडयंत्र आहे, असंही यावेळी खडसे म्हणाले.

# ‘लाडकी बहीण योजने’त घोटाळा, ‘एसआयटी’ चौकशी करा; सुप्रिया सुळे

नवी दिल्ली । वृत्तसेवा

'लाडकी बहीण योजना' सुरू झाल्यापासूनच विविध कारणांमुळं ही योजना चर्चेत राहिली आहे. कधी बोगस आधार कार्ड दाखवत या योजनेचे पैसे उकळले, तर कधी सरकारी महिला कर्मचाऱ्यांनीही या योजनेचा लाभ घेतला. आता तर चक्क अनेक पुरुषांनीच या योजनेचा लाभ घेतल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळं या योजनेवरुन विरोधक राज्य सरकारवर टीका करत आहेत.

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी 'लाडकी बहीण योजने'वरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काही सवाल उपस्थित करत महायुती सरकारवर गंभीर आरोप केलेत. 'लाडकी बहीण योजने'त ४ हजार ८०० कोटींचा घोटाळा झालाय. महिलांचे पैसे पुरुषांच्या खात्यात कसे गेले? या घोटाळ्याची एसआयटी चौकशी करा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत बोलताना केली.

**सॉफ्टवेअरमध्ये घोटाळा**

योजनेच्या पहिल्या टप्प्यात २६ लाख फॉर्म कसे रद्द झाले नाहीत? सॉफ्टवेअरमध्ये घोटाळा आहे. त्यात घोटाळा झाला असल्यास त्यासाठी राज्य सरकार जबाबदार असेल. त्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांना घ्यावी लागेल. तसंच संपूर्ण मंत्रिमंडळाची देखील जबाबदारी आहे, असं म्हणत खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुती सरकारवर गंभीर आरोप केलेत.

**...तर संसदेत प्रश्न उपस्थित करणार**

राज्य सरकारनं या प्रकरणात कारवाई केली नाही तर संसदेत हा प्रश्न उपस्थित करणार आहे. मी कुणावरही भ्रष्टाचाराचे खोटे आरोप केले नाहीत आणि करणारही नाही. मी अदिती तटकरेंवर आरोप केले नाहीत. तसंच एकट्या अदिती यांच्यावर आरोप करणार नाही. याला संपूर्ण मंत्रिमंडळ जबाबदार आहे, असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी केली.

# धानोरा रोडच्या रस्त्यासाठी 'लोटांगण' आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील धानोरा रोडची अवस्था अतिशय दयनिय झाली आहे ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत.मात्र नगरपालिका प्रशासन दखल घेत नसल्यामुळे साहस आदोडे, नितेश उपाध्ये यांच्यासह त्या भागातील नागरीकांनी मंगळवार (दि.२९) रोजी दुपारी खड्ड्यांच्या पाण्यामध्ये लोटांगण घेत आंदोलन केले.

बीड शहरातील नगर रोड ते पालवण चौक (धानोरा रोड) या पावणे दोन किलोमिटरच्या रस्त्यावर प्रचंड खड्डे झाले आहेत. त्याचबरोबर मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर मुख्य रस्ता, विठ्ठल चौकापर्यंतच्या रस्त्याची देखील अतिशय दयनिय अवस्था झाली आहे. एवढे प्रचंड खड्डे पडलेले असतानाही नगर पालिका कसलीच दखल घेत नसल्यामुळे साहस आदोडे, नितेश उपाध्ये यांच्यासह त्या भागातील नागरीकांनी आज मंगळवार (दि.२९) रोजी दुपारी खड्ड्यांच्या पाण्यामध्ये लोटांगन घेत नगर पालिकेचा निषेध नोंदवला.नगर पालिका हाय-हाय असे म्हणत आंदोलकांनी थेट खड्ड्यात बसुन आंदोलन केले.

दरम्यान नगर रोड, पालवण चौक या रस्त्यांसह छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज, राजुरीवेस, जुना बाजार या रस्त्यांवर प्रचंड खड्डे पडले आहेत. मात्र नगर पालिकेने खड्डे दुरुस्त करण्याऐवजी लोकांवर खड्ड्यांमध्ये लोटांगन घ्यायची वेळ आणली आहे. बीड शहरात प्रत्येकजण नगर पालिकेच्या नावाने रोष व्यक्त करत असतांनाही नगर पालिका प्रशाननाला त्याचे काहीच वाटत नसल्याने त्यांनी नाकला गुंडाळली का ? असा प्रश्न नागरीकांमधुन उपस्थित होऊ लागला आहे.



## गुन्हेगारी बातम्या

### शाळेत घुसून मारहाण करणाऱ्या टोळीला अटक



बीड । प्रतिनिधी

शहरातील सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या आवारात शाळेतील दोन विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून पाथरूड गल्लीतील काही युवकांनी थेट शाळेत घुसून एका विद्यार्थ्याला आणि त्याच्या पालकाला बेदम मारहाण केली. ही धक्कादायक घटना २३ जुलै रोजी घडली.बीड शहर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सर्व आरोपींची ओळख पटली असून यातील आठ प्रमुख आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीत अनेश नरेश गायकवाड (२५), साहिल नरेश गायकवाड (२१), शेखर रत्नाकर जाधव (३१), आकाश पालकर जाधव (३९) सर्व राहणार पाथरूड गल्ली, बीड यांचा समावेश आहे.या आरोपींपैकी दोघांवर यापूर्वीही मारहाणीचे गुन्हे दाखल असून ते अभिलेखावरील गुन्हेगार आहेत. तसेच या प्रकरणातील चार अल्पवयीन आरोपींना पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.गुन्हा दाखल झाल्यानंतर काही आरोपी फरार होते. मात्र पोलिसांनी कसून तपास करत त्यांना गजाआड केले. अशा गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्पष्ट केले आहे.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कौवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पो.उ.नि. महेश जाधव, पो.ह. संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार आणि बापू गायकवाड यांच्या पथकाने केली.या घटनेमुळे शाळांतील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असून पालक वर्गामध्येही संतापाचे वातावरण आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी पोलीस विभाग अधिक सतर्क राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# वैद्यनाथ बँक निवडणूक: चार जागा बिनविरोध

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

मराठवाड्यातील अग्रगण्य सहकारी बँक असलेल्या वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेची निवडणूक बिनविरोध होईल असे शेवटच्या क्षणापर्यंत वाटत असताना आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अखेर वैद्यनाथ बँकेची निवडणूकच लागली आहे.

एकूण १७ जागांसाठीच्या या निवडणुकीत वेगवेगळ्या मतदारसंघातील चार जागा बिनविरोध निवडल्या गेल्या आहेत. मात्र प्रतिष्ठेच्या सर्वसाधारण मतदारसंघातील बारा जागेसाठी १४ अर्ज कायम राहिले. त्यामुळे या मतदारसंघासाठी निवडणूक अटळ आहे तर भटक्या विमुक्त जाती प्रवर्गासाठीच्या मतदारसंघातून निवडावयाच्या एका जागेसाठी दोन अर्ज कायम राहिल्याने या प्रवर्गासाठी निवडणूक अटळ झाली आहे.

महिला प्रवर्गासाठीच्या दोन जागा बिनविरोध झाल्या असुन यामध्ये माजी खासदार व विद्यमान संचालक डॉ. प्रीतम मुंडे आणि सौ. माधुरी योगेश मेनकुदळे यांची बिनविरोध निवड झाली. अनुसूचित जाती मतदारसंघासाठीच्या एका जागेवर प्रा. विनोद जगतकर यांची बिनविरोध निवड झाली. तर इतर मागासवर्गीय मतदार संघातील एका जागेसाठी अनिल दिगंबरराव तांदळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. एकंदरीत आता सर्वसाधारण मतदारसंघासाठीच्या १२ जागेसाठी १४ अर्ज तर भटक्या विमुक्त जाती मतदारसंघासाठीच्या एका जागेसाठी दोन अर्ज शिल्लक राहिले आहेत. या दोन मतदारसंघातील एकूण १३ जागेसाठी आता निवडणूक प्रक्रिया होणार आहे. १० ऑगस्ट रोजी या निवडणुकीची प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी अंतिम चित्र

सर्वसाधारण मतदारसंघातील १२ जागेसाठी १४ उमेदवार

१.लाहोटी संदीप सत्यनारायण
२.जोशी प्रकाश रंगनाथराव
३.देशपांडे प्रविण भाउसाहेब
४.निर्मळे महेश्वर शिवशंकर
५.लोमटे सुशांत शरदराव
६.वाकेकर विजय सुवालाल
७.कलंत्री मनमोहन चंदुलालजी
८.डुबे अमोल विकासराव
९.जैन कुलभूषण शांतिलालजी
१०.सामत विनोद अशोक
११.शिंदे बाबासाहेब शंकर
१२.धमपलवार वैजनाथ नागनाथ
१३.लोमटे राजेंद्र भगवानराव
१४.मुंडे राजाराम लक्ष्मण

**भटक्या विमुक्त जा.ज. मतदारसंघात एका जागेसाठी दोन अर्ज**

१. फड राजाभाऊ श्रीराम
२.कराड रमेश शेषेराव

**महिला प्रतिनिधी : दोनही जागा बिनविरोध**

१.मुंडे प्रितम गोपीनाथराव
२.मेनकुदळे माधुरी योगेश

इतर मागासवर्गीय एक जागा बिनविरोध: तांदळे अनिल दिगंबर

**अनुसुचित जाती एक जागा बिनविरोध:** जगतकर विनोद गणपतराव

**एकूण बिनविरोध जागा : ४**

**निवडणूक होणार या जागांसाठी**

१२ जागा- सर्वसाधारण : १४ उमेदवार,१ जागा

भटक्या विमुक्त जा.ज.: २ उमेद्वार, एकूण १३ जागेसाठी होणार निवडणूक

# महादेव मुंडेंच्या कुटुंबाला न्याय देण्यासाठी मनोज जरांगे मैदानात; बीडमध्ये १ ऑगस्ट रोजी बैठक

बीड। प्रतिनिधी

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या क्रूर हत्येचे मारेकरी अजूनही सापडलेले नाहीत. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचा न्याय मिळवण्यासाठीचा लढा सुरूच असला तरी, अद्याप त्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे आता त्यांच्या कुटुंबाला न्याय देण्यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि सकल मराठा समाज मैदानात उतरला आहे. यासाठी १ ऑगस्ट रोजी बीड शहरात महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे.



महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात मोठे आंदोलन उभारले जाणार आहे. याचाच एक भाग म्हणून, १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता बीड शहरातील कॅनॉल रोड येथील रामकृष्ण लॉन्स येथे बीड जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने सर्वधर्मीय व सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि महादेव मुंडे यांचे कुटुंब उपस्थित राहणार आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली जाईल आणि महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. जिल्ह्यातील सर्वपक्षीय आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाज, बीड जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता शासकीय तंत्र प्रशाला येथे द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता द्विलक्षी अभ्यासक्रमातील ऐच्छिक विषय घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. या अंतर्गत इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, स्कूटर मोटर सायकल सर्व्हिसिंग व मेकानिकल मेंटेनन्स या विषयांपैकी एक विषय ऐच्छिक निवडता येतो. सदरील विषय हा एकुण २०० गुणांचा असून त्यापैकी प्रात्यक्षिक परीक्षेचे १२० गुण व थेअरी परीक्षेचे ८० गुण असतात. हे विषय इंजिनिअरींग क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून, यामुळे इयत्ता १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे शक्य आहे तसेच या इंजिनिअरींग ग्रुपच्या विषयामुळे त्यांना इंजिनिअरींगचे मुलभूत ज्ञान प्राप्त होते व त्याचे महत्व लक्षात येऊन आवड निर्माण होते.

हे विषय घेण्यासाठी बीड तालुक्यातील कोणत्याही महाविद्यालयात इयत्ता ११ वी तील प्रवेशित विद्यार्थी विहित नमुन्यात अर्ज करु शकतात. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे संपर्क साधावा.

तसेच सविस्तर माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.जी.पी.गवळी - ९४२१६१०९०१,एस.महिंद्रकर - ८६६८५७०८९९, डी.टी.गायकवाड - ९८८१४५१७५०यांच्याशी असे आवाहन शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी केले आहे.

# ४ ऑगस्टला जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

# भोलेनाथांच्या विविध लीलांनी पावन झालेले शिवमहापुराण भक्ती आणि शक्तीचे प्रतीक – ज्ञानेश्वर माऊली थोरात जालनेकर

बीड । प्रतिनिधी

भगवान भोलेनाथांच्या विविध लीला आणि सुंदर प्रसंगाने पावन झालेला शिवमहापुरार हा महान ग्रंथ असून भक्ती आणि शक्तीने पवन झालेला ग्रंथ असल्याचे प्रतिपादन शिवमहापुराण कथा प्रवक्ते श्री. ज्ञानेश्वर माऊली थोरात जालनेकर यांनी मंगळवारी कथेप्रसंगी सांगितले.

पुढे बोलताना महाराज म्हणाले की भगवान भोलेनाथ अत्यंत दयाळू, कृपाळू असून मनोभावे भक्ती केल्यास भक्तांच्या हाकेला धावणारी एकमेव देवता आहे. पेठ बीड भागातील पौराणिक असलेल्या श्री महादेव मंदिरात मागील अनेक वर्षांपासून शिवमहापुराण कथेचे भक्तिसार आपण मोठ्या भक्तिभावाने श्रावण मासाच्या निमित्ताने श्रवण करीत आहात. ही कौतुकास्पद बाब असून शिव महापुराण कथासार अत्यंत रसाळ आणि श्रवणीय महान ग्रंथ असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पेठ बीड भागातील पौराणिक श्री. रामेश्वर महादेव मंदिर काकू– नाना मळा येथे श्रावणमास निमित्ताने शुक्रवार दि. २५ पासून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून कथेत सुंदर आकर्षक देखावे सादर करण्यात आले. यावर्षीचे यावर्षीच्या कथेचे यजमान श्री रमेश घोडके व परिवाराच्यावतीने महाराजांचे स्वागत ग्रंथ पूजन करण्यात आले. कथा प्रवक्ते श्री. ज्ञानेश्वर माऊली महाराज थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून गुरुवार दि.३१ पर्यंत संगीतमय शिवमहापुराण कथेस प्रारंभ झाला. शिवपुराण कथेची वेळ दुपारी एक ते चार दरम्यान असून कथे दरम्यान रामेश्वर मंदिर परिसर भाविकांच्या उपस्थितीत भरुन पावतो आहे.


श्री. ज्ञानेश्वर माऊली थोरात जालनेकर यांच्या अमृतवाणीतून संगीतमय शिवमहापुराण कथेची सांगता गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ रोजी दहा ते एक कथेची वेळ असून शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञास परिसरातील महिला, पुरुष भाविकभक्तांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, जय श्रीराम गणेश मित्र मंडळ पेठ बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात पाचशे महिलांना साड्यांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

क्रांतीशील विचारवंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. कष्टकरी आणि श्रमिक महिलांच्या सन्मानार्थ आयोजित या कार्यक्रमात तब्बल पाचशे महिलांना साडी-वाटप करण्यात आले. त्यामुळे समाजात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहरने एक आदर्श निर्माण करून दिला आहे.असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

बीड शहरात दि.२८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्य सम्राट गौरव महोत्सव साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.२८) रोजी चांदणे वाडा येथे साडी वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्ष



म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर, प्रेमलताताई चांदणे, जयश्रीताई विधाते, जयंतीचे मार्गदर्शक अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके,अशोक सोनवणे ,केशव लोंढे,जयंती समिती सचिव सुनील पाटोळे,पोपट मिसाळ, सुधाकर धुरंदरे, आनंद चांदणे आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवर म्हणाले की, खऱ्या अर्थाने श्रमदान करणाऱ्या आणि आयुष्याची लढाई मोठ्या खंबीरपणे लढणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमामागे अण्णाभाऊ साठेंच्या विचारांची प्रेरणा आहे. त्यांनी आपल्या साहित्य, गीत आणि लेखनातून श्रमिकांचे दुःख, स्वप्नं आणि संघर्ष जगासमोर मांडले. त्यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेला हा उपक्रम म्हणजे त्यांच्या कार्याला खरे अभिवादन आहे.

या उपक्रमामुळे समाजात सहवेदना, सन्मान आणि सामाजिक एकतेचा संदेश पोहचवला गेला असून अण्णाभाऊंच्या विचारांनी प्रेरित झालेल्या नव्या पिढीसाठी हे एक मार्गदर्शक ठरणार आहे. असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

दरम्यान अण्णाभाऊ साठे गौरव महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना उपस्थित रहावे असे आवाहन जयंती उत्सव समितीकडून करण्यात आले आहे.

# बीडमध्ये ३१ जुलै रोजी एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम; गीत-संगीताचा कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

३१ जुलै रोजी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या गीत-संगीताच्या मोफत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा गायक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.



गीत-संगीताचा हा कार्यक्रम पीस बुक डेपोचे संचालक, गायक तथा आयोजक एम.एम.शेख दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सादर करीत आहेत. त्यांच्यासोबतच प्रियंका भंडारी, आकाश जाधव, संध्या जाधव, निशा उजगरे, शेख मझहरोद्दीन, सय्यद मुजीब हे गायक-गायिका आपली गायन कला सादर करणार आहेत.

एम.एम.शेख हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा कार्यक्रम विना खंड सादर करीत आहेत. दरवर्षी या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांची उत्स्फूर्त उपस्थिती असते. दिवसेंदिवस या कार्यक्रमाची लोकप्रियता वाढत चालली आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमात सहभागी असणारे सर्व गायक कलाकार विनामूल्य हा कार्यक्रम आयोजित करतात. आणि या कार्यक्रमाच्या माध्यमातून मरहूम मोहम्मद रफी यांना श्रद्धांजली वाहतात.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा सदाबहार गीतांचा मोफत कार्यक्रम येत्या गुरुवार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी बीड शहरातील जालना रोड स्थित हॉटेल हिना इंटरनॅशनल समोर, असलेल्या संग्राम हॉटेल हॉल, जालना रोड, बीड येथे सायंकाळी ६:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात बीड जिल्हा परिषदचे वरिष्ठ सहाय्यक युसूफ़ पठाण यांची विशेष उपस्थिती राहणार असून साऊंड सिस्टिमची जबाबदारी नेहमीप्रमाणे कृष्णा पांगरे सांभाळणार आहेत. तरी रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा गायक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक– विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

"Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

## जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**




**दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा**